# जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.जिवायो 1007/प्र.क्र.39/का-1444, दि.16 फेब्रुवारी, 2008
2. पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.जिवायो-2010/प्र.क्र.340/पदुम-4, दि.30.08.2010
3. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.परभणी यांचे पत्र क्र. जिपप/पसंवि/तां/सभा/944/18, पशुसंवर्धन विभाग, जि.प.परभणी, दि.13.11.2018

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/ पशुसंवर्धन /नि.वि./का.क्र.1/ 2105

दि. 17 नोव्हेंबर, 2018

## जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018-19 अंतर्गत निधी वितरण आदेश

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 या वितीय वर्षामध्ये दुभत्या जनारांना खादय उपलब्धतेसाठी सुधारणा या योजनेसाठी अनुक्रमे रु.10.00 लक्ष तरतूद मंजूर असून रु.7.00 लक्ष BDS वर प्रणालीवर उपलब्ध झालेली आहे.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.परभणी यांनी संदर्भ क्र.3 अन्वये खालील परिशिष्टात दर्शविलेल्या योजनेसाठी निधी मागणीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास अधिन राहून व उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालील परिशिष्टात दर्शविलेल्या कामासाठी **रु.7.00 लक्ष (अक्षरी रुपये सात लक्ष फक्त)** रक्कम वितरीत करण्यात येत आहे.

(लाखात .रु)

| अ.क्र. | योजनेचे नाव | मंजुर तरतूद | BDS वर उपलब्ध निधी | प्रशासकीय मान्यता रक्कम | **या आदेशान्वये वितरित निधी** | लेखाशिर्ष नियोजन विभाग मागणी क्र -ओ.50 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | | 6 |
| **जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.परभणी** | | | | | | |
| 1 | दुभत्या जनारांना खादय उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रमातंर्गत<br>1. मका बियाणे खरेदी<br>2. ठोंबे खरेदी | 10.00 | 7.00 | 10.00 | **7.00** | 2403 - पशुसंवर्धन, (00) 107 वैरण व पशुखादय विकास, (49) जिल्हा योजना - परभणी (49) (01) दुभत्या जनारांना खादय उपलब्धतेसाठी सुधारणा (2403 6766) 31 - सहाय्यक अनुदाने |
| **एकुण** | | **10.00** | **7.00** | **10.00** | **7.00** | |

**(अक्षरी रुपये सात लक्ष फक्त)**

## अटी व शर्ती

1. सदर कामाची/योजनेची अंमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना/निकषानुसारच करण्यात यावी तसेच शासन स्तरावर मंजुर केलेल्या कामाची व्दिरुक्ती होणार नाही व सदरीचे काम अनुज्ञेय असल्याची खात्री करुनच सदर काम अनुज्ञेय असल्यासच कामास सुरुवात करावी.
2. या आदेशान्वये वितरीत करण्यात आलेला निधी चालू आर्थिक वर्ष 2018-19 अखेरीस अखर्चित राहिल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील.
3. सदरील कामाची गुणवत्ता उत्कृष्ट राहील याची दक्षता घेण्यात यावी. सदर कामे पुर्ण झाली आहेत याची खात्री करुनच अंतिम देयक अदाई करण्यापुर्वी कामनिहाय कामांचे फोटो सादर केल्यानंतरच सदर निधी वितरित करण्यात यावा. प्रत्यक्ष खर्चात बचत झाल्यास सदर निधी तातडीने शासनखाती जमा करण्यात यावा. या योजनेंतर्गतच्या कामांना आवश्यक असलेली प्रशासकीय मान्यता/तांत्रीक मंजूरी जिल्हा परिषदेच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन अधिकाऱ्यांची राहील या अटीवरच सदर निधी वितरण करण्यात येत आहे.
4. सदरील कामाची गुणवत्ता उत्कृष्ट राहील याची दक्षता घेण्यात यावी. सदर कामे पुर्ण झाली आहेत याची खात्री करुनच अंतिम देयक अदाई करण्यापुर्वी कामनिहाय कामांचे फोटो सादर केल्यानंतरच सदर निधी वितरित करण्यात यावा. प्रत्यक्ष खर्चात बचत झाल्यास सदर निधी तातडीने शासनखाती जमा करण्यात यावा. सदरील कामांवर तांत्रिक मान्यता/ प्रशासकिय मान्यतेच्या मर्यादेतच खर्च करावा जास्तीच्या खर्चाची कार्यान्वयीन यंत्रणा जबाबदार राहिल.

5. या आदेशान्वये मंजूर केलेल्या कामाची पुनरावृत्ती झालेली नाही याची खात्री करूनच काम सुरू करावे. कामाची पुनरावृत्ती झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

6. या योजनेसाठी / कामासाठी आवश्यक असलेल्या तांत्रीक बाबीची तसेच शासनाने ठरवून दिलेल्या निकषांची पुर्तता करण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

7. सदरील सहाय्यक अनुदानांची उपयोगीता प्रमाणपत्रे व पुर्णत्वाचे दाखले महालेखापाल कार्यालयास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी. तसेच या योजनांवर झालेल्या खर्चाचे महालेखापाल यांचे कार्यालयात नोंद झालेल्या खर्चाशी ताळमेळ घालुन त्याची सुध्दा एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

8. या योजनेतंर्गत घेण्यात येणाऱ्या कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

9. प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमेच्या अधिन राहूनच योजनेवर खर्च करण्यात यावा. तसेच सदरील योजना अन्य कोणत्याही निधीतून घेण्यात आली नाही याची खात्री करावी.

10. या योजनेंतर्गत कामांची खाजगी/त्रयस्थ यंत्रणेमार्फत मुल्यमापन करण्यात येवू शकेल. तेव्हा योजनेतंर्गत होणाऱ्या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि दरमहा 5 तारखेपूर्वी या कार्यालयास अहवाल सादर करावा.

11. आवश्यक असलेल्या कामाबाबत निविदा मागविणे, स्विकृत करणे व खरेदीबाबत उदयोग व ऊर्जा विभागाचा शासन निर्णय क्र.भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/ उदयोग-44, दि.30.10.2015 नुसार विहित पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

12. प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात प्रत्येक दरांचे वर्णन / दर / दरपृथःकरण / रक्कम /दर पृथःकरणातील गृहित धरलेली अंतरे व अनुषंगिक ईतर बाबी तांत्रीक मान्यता प्रदान करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर तपासणे अनिवार्य आहे. या संदर्भात या कार्यालयाचे / शासनाचे कोणतेही उतरदायित्व असणार नाही.

13. या योजनेतील खर्च 2018-19 या वितीय वर्षात सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत कॅशफ्लोनुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. या योजनेवर होणारा स्तंभ क्र.6 च्या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा.

प्रति,

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

1. महालेखापाल, नागपूर -2
2. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना कार्यवाहीस्तव
3. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी
4. निवड नस्ती

स्वा/-
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी